कापुरबावडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.deptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ०८ /२०२६ दि १२/०१/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

ज्याअर्थी, कापूरबावडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत ठाणे महानगरपालिका ठाणे परिसरात सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने **स्व.बाबुराव सरनाईक जिम्नॅशयम सेंटर, बेथनी हॉस्पीटल समोर, पोखरण रोड नं.२, ठाणे** येथे स्ट्रांगरुम असुन सदर ठिकाणाहुन दिनांक १४/०१/२०२६ रोजी निवडणुकीच्या मतपेटी (ईव्ही.एम.मशिन) व निवडणुकीचे अनुषंगाने लागणारे इतर साहित्य वाटप तसेच मतदान झाले नंतर मतपेटी (ई.व्ही.एम.मशिन) सदर ठिकाणी जमा होणार आहे. तसेच दि.१६/०१/२०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद –	१) बिरसा मुंडा चौकाकडून पोखरण रोड नंबर ०२ मार्गे गांधीनगर चौकाकडे जाणारे सर्व प्रकारच्या वाहनांना **बिरसा मुंडा चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरचे मार्गावरून जाणारी सर्व प्रकारची वाहने ही डावीकडे वळण घेवून सिध्दांचल, पवारनगर मार्गे अथवा उजवीकडे वळण घेवून देवदयानगर मार्गे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	गांधीगनर चौकाकडून पोखरण रोड नंबर ०२ मार्गे बिरसा मुंडा चौकाकडे जाणारे सर्व प्रकारचे वाहनांना **गांधीनगर चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरचे मार्गावरून जाणारी सर्व प्रकारची वाहने ही गांधीनगर चौक येथुन उजवीकडे वळण घेवून ग्लॅडी अल्वारिस रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	वसंतविहार सर्कलकडून हनुमानमंदिराकडे जाणारे सर्व प्रकारचे वाहनांना **वसंत विहार सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरचे मार्गावरून जाणारी सर्व प्रकारची वाहने ही वसंत विहार सर्कल येथुन डावीकडे वळण घेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे अथवा उजवीकडे वळण घेवून सिध्दांचल मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना **दिनांक १४/०१/२०२६ रोजी सकाळी ०५.०० ते दिनांक १६/०१/२०२६ रोजी मतमोजणी प्रक्रीया पुर्ण होई** पर्यंत अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट, ठाणे
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे
पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
ठाणे पोलीस पत्रक

प्रत :– समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,

स.पो.आ. वागळे वाहतूक विभाग, व पोलीस निरीक्षक, कापूरबावडी वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.